क्रमांक : ११२४४ /म.वि.स./ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ७ जुलै, २०२३

**:: प रि प त्र क ::**

विषय : **मंत्री परिषदेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या मंत्री महोदयांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागाचा ज्या गटात समावेश आहे त्या गटाच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तराच्या दिवशी सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तर देण्याची विनंती करण्याबाबत...**

संदर्भ : (१) या सचिवालयाचे पत्र क्र.९५५०/ब दिनांकित २५ मे, २०२३
(२) सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्रमांक शाकानि.एमआयएन-२०२३/प्र.क्र.१९६/३०., दिनांकित ४ जुलै, २०२३

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ वरील पत्राच्या अनुषंगाने निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, सन २०२३ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्यावेळी अस्तित्वात असलेली मंत्रीपरिषद आणि त्यांच्या अधिनस्त असलेले विभाग यास अनुसरून मा.अध्यक्षांनी नेमून दिलेल्या दिवसांचा चक्रानुक्रम दिनांक २५ मे, २०२३ रोजी वितरित करण्यात आलेला आहे. त्यानुसार मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून दिलेल्या विषयाचे तारांकित प्रश्न मंत्रालयीन विभागांकडे उत्तरासाठी पाठविण्यात आले होते. तथापि, संदर्भ क्रमांक २ नुसार मंत्रीमंडळाचा विस्तार करण्यात आला आहे.

उपरोक्त अधिसूचना लक्षात घेता सद्य:स्थितीत मंत्रीमंडळाच्या विस्तारानंतर प्रश्नोत्तराच्या गटात समाविष्ट असलेले मंत्री व त्यांच्या अधिनस्त असलेले विभाग यात कोणताही बदल करणे या टप्प्यावर शक्य होणार नसल्याने, नव्याने मंत्रीमंडळात समावेश झालेल्या मंत्रीमहोदयांना आपल्या अधिनस्त असलेल्या विभागाचा ज्या गटामध्ये समावेश आहे त्या गटाच्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या दिवशी सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागणार आहेत.

अत: आपणांस कळविण्यात येते की, संबंधित गटाच्या उत्तराच्या दिवशी मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याची विनंती करण्यात यावी.

**(सीमा तांबे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :**

१. सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०० ०३२. (प्रत्येकी २ प्रती)
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)